Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV | ISSUE-XI | Nov. | 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# ७३ व्या विशोधनानंतर स्थानिक शासनातील महिलांच्या सहभागाची उपयुक्ता

प्रा.श्रीराम दामला जाधव
N.S.S.S.Arts college,Telgaon

## प्रस्तावना :-

आधुनिक युगात कोणतीही व्यक्ती राजकीय व्यवस्थेच्या बाहेर राहु शकत नाही व्यक्तीला आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी राजकीय व्यवस्थेवरच अवलंबून राहावे लागते. बार्करने म्हटल्या प्रमाणे राज्य हे पुर्ण विकसीत झालेल्या व्यक्तीचे नैसर्गीक घर आहे. व्यक्तीच्या विकासाचे ते साधन आहे. म्हणजे राजकीय व्यवस्थेत राहुनच व्यक्तीला आपल्या गरजा पुर्ण कराव्या लागतात. त्याकरिता वेगवेगळे संबंध प्रस्थापित करावे लागतात कधी सहकार्य तर कधी संघर्ष अशी भुमिका घ्यावी लागते. आधुनिक काळात प्रातिनिधक लोकशाहीचा स्विकार केल्याने जनतेच्या सहभागाला महत्वाचे स्थान आहे.

जागतिक स्तरावर जसजशी लोकशाहीची मुळे रुजत गेली व स्थिरावली तसतशी राजेशाही कोलमडली जनता आपल्या प्रतिनिधीद्वारे राज्यकारभार पाहु लागली आणि राजाचे अधिकार संपुष्टात आले. विज्ञानाच्या प्रगतीने माणसावरील धर्माची श्रध्दा उडाली. लोकशाहीचे वाढते आकर्षण व विज्ञानाची प्रगती यांचा परिपाक म्हणून समाजवादाला चालना मिळाली समान नागरी कायदा हा समाजवादाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे पाऊल आहे. भारत जगातील लोकशाही शासना व्यवस्था असणारे सर्वात मोठे राष्ट्र आहे लोकशाही शासन प्रकारामध्ये जनता शासनाच्य अधिकाराचा वापर स्वत: किंवा त्यांनीच निवडलेल्या लोक प्रतिनिधी मार्फत करते म्हणून आधुनिक काळात लोकशाही शासन व्यवस्था जगात लोकप्रीय शासन सत्ता म्हणून ओळखली जाते. लोकशाही शासन व्यवस्थेत सत्तेच्या विकेंद्रीकरणास महत्व असल्याने अधिकाधीक लोक सत्तेत सहभागी व्हावे यासाठी शासन स्तरावरुन प्रयत्न केले जाते. स्वातंत्र्यानंतर लोकशाही शासनात सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी जाणून बुजून प्रयत्न करुन सत्ता विकेंद्रीकरण केले आहे. भारतात सत्ता विकेंद्रीकरणासाठी व महिलांना राजकीय सत्तेत सहभागासाठी ७३ व ७४ वे संविधान दुरुस्ती विधेयक मैलाचा पाऊल ठरले असून भारतात सत्ता विकेंद्रीकरणासाठी व महिलांच्या राजकीय सहभाग यासाठी फार महत्वाचे पाऊल ठरले आहे या अनुषंगाने संशोधन लेख लिहण्यात आलेला आहे.

## स्थानिक शासनात महिलांचा सहभाग :-

भारताच्या शासन सत्तेत प्रामुख्याने तीन कालखंड पाडले जातात प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड व आधुनिक कालखंड, आधुनिक कालखंडात स्त्रियांना शासनात सहभागी करुन घेण्यासाठी संविधान दुरुस्ती करुन राजकीय सहभागासाठी प्रयत्न केला जात आहे. परंतू प्राचीन व मध्ययुगीन कालखंड महिलांच्या राजकीय सत्तेसंबंधी वेगळी पार्श्वभूमी आहे.

प्राचीन भारताच्या गौरवशाली उज्वल इतिहासाकडे बघीतल्यास तत्कालीन समाजातील स्त्रियांचे स्थान लक्षात येते. अंदाजे इ.स.पुर्व २००० ते १४०० हा आर्याच्या आगमनाचा काळ मानला जातो. भारत वर्षात आर्याचे

आगमन झाले. विस्तार झाला ही ऐतिहासिक दृष्ट्या महत्वपुर्ण घटना आहे. वेद हे आर्याचे पवित्र ग्रंथ, वेदासारख्या अतिप्राचीन संहितात स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या सन्माननीय स्थानाचे उल्लेख आहे. वैदिक काळाच्या पुर्वार्धात स्त्रिला समाजात महत्वाचे स्थान होते. विवाहामुळे तिला कुटूंबात सम्राज्ञीपद दिले जाई. जैमिनिच्या पुर्व मिमांसेनूसार स्त्रीला वारसाधिकार व यज्ञाधिकार दिलेले दिसतात, उपनिषद काळात गार्गी, मैत्रीची यांचे नामोल्लेख आढळतात. पुराणकाळात कैकयी, मंथरा, राजनितीसी संबंधित होत्या. द्रौपदी, कुंती महाभारतातील राजनितीच्या केंद्रस्थानी होत्या. चौथ्या शतकात दुसऱ्या चंद्रगुप्ताने आपली मुलगी प्रभावती हीला आपल्या साम्राज्यातील एका भागाचे मुख्य बनवले होते. एकंदरीत प्राचीन कालखंडात महिलांचा राजनीतीशी संबंध होता.

**मध्ययुगीन कालखंड :-**

प्राचीन कालखंडा प्रमाणानेच काही प्रमाणात मध्ययुगीन कालखंडातही स्त्रियांचा राजनितीशी संबंध होता. इ.स.१२०६ ते १५२६ मध्ययगीन कालखंड, १५२६ ते १७६१ मोगल कालखंड, १६३० ते १७६१ मराठा कालखंड, प्राचीन काळातील असो की मध्ययुगीन काळातील असो मोठ्या घराण्यातील असामान्य व्यक्तीमहत्वाच्या स्त्रियांना नेतृत्व करण्याची संधी मिळालेली आहे. यात सय्यद सुलताण अलाऊद्दीन आलमशहा यांची कन्या जलिला ऊर्फ हलिला ही हुकूमशाहा शार्कीची राणी होती. चांदबीबी सुलताण हे सुध्दा राजनितीतील महत्वाचे नाव भारताची मलिका म्हणून नुरजहाँचा नामोल्लेख करावा लागेल. मराठा राजवटीतही अनेक स्त्रियांनी राजनितीत सहभाग घेतला आहे. राजकारणी स्त्री म्हणून जिजाबाई, ताराबाई, आहिल्याबाई होळकर , आनंदीबाई, गोपिकाबाई इत्यादी स्त्रीया राजनितीशी संबंधीत होत्या.

**ब्रिटीश कालखंड :-**

ब्रिटीशांनी देशांची राजकीय सत्ता हस्तगत करेपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सतत परिवर्तन होत गेले. परंतू ही सत्ता ब्रिटीशांकडे येताच त्यांनी पाश्चिमात्य पध्दतीची प्रशासन पध्दती आमलात आणली. १८५७ च्या उठावानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यामध्ये अमुलाग्र बदल झाला हे पुढील घटनावरून दिसून येते.

**लॉर्ड मेयोचा ठराव १८७० :-**

लॉर्ड मेयोचा ठरावा हा भारतातील पंचायतराज व्यवस्था निर्माण करण्याचा महत्वाचा प्रयत्न मानला जातो. लॉर्ड मेयोनी सरकारी कामासाठी पैसा स्थानिक कराद्वारे उभा करण्यासाठी शासनाच्या आर्थिक विकेंद्रीकरणाचा उपाय सुचविला यासाठी केंद्र सरकारची काही खाते उदा. शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, साफ सफाई प्रांतसरकारकडे सोपवली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वाढीला मदत मिळवून १८७१ मध्ये अनेक प्रांतात उदा. पंजाब, बंगाल मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेसंबंधी कायदे केले. १८७३ मध्ये चार्ल्स ट्रेन्हेलेगन यांनी गाव तेथे परिषद अशी पिरॅमिड पध्दत सुचविली.

**लॉर्ड रिपनचा ठराव - १८८२ :-**

लॉर्ड मेयोनंतर लॉर्ड रिपन यांनी भारताच्या गव्हर्नर जनरल पदाची सुत्रे स्विकारली त्यांना इंग्लंड मधील प्रशासनाचा दांडगा अनुभव होता. स्थानिक स्वराज्य संस्थांना पुन्हा लॉर्ड रिपनच्या १८ मे १८८२ च्या ठरावाने ब्रिटीश काळात महत्व प्राप्त झाले. रिपन उदारमतवादी होता. त्याने भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी

आपला क्रांतीकारी ठराव पास करून ब्रिटीश राजवटीत खऱ्या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थांना न्याय दिला. त्यामुळे लॉर्ड रिपन यांचे नाव भारताच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासात आदराने घेतले जाते. लॉर्ड रिपनला भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक मानल्या जाते. रिपनने आपल्या ठरावामध्ये प्रांतातील सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात हस्तक्षेप करु नये असे निर्देश दिले. स्थानिक शासन संस्थेच्या वाढीसाठी पोषक मुलभूत तत्वांचा समावेश केला होता. लॉर्ड रिपनचा ठराव प्रसिध्द करण्यामागे स्थानिक प्रशासनाला तान कमी करणे व लोकशाहीचे प्रशिक्षण देणे तसेच भारतीयांच्या हाती स्थानिक शासन सोपवने हा उद्देश होता. परंतू लॉर्ड रिपनच्या ठरावास तत्कालीन नोकरशाहीच्या विरोधामुळे ज्या प्रमाणात अंमलबजावणी व्हावयास पाहिजे त्या प्रमाणात झाली नाही यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासा करीता विविध समित्या, आयोग, कायदे तयार करण्यात आले. सन १९०७ मध्ये भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थाचा आढावा घेण्यासाठी ब्रिटीशांनी विकेंद्रीकरण आयोग स्थानिक शासनाचा पाया समजण्यात यावा व गावांकरीता ग्रामपंचायत स्थापन करण्यात यावे. असे सुचविल्यानंतर १९०९ ला हा विषय रॉयल कमिशनने गांर्भीयाने हाताळलेला दिसतो. रॉयल कमिशनने ग्रामपंचायतच्या विकासावर भर दिला तसेच ग्रामपंचायतला अधिकाधिक अधिकार देण्यात सुचविले या कमिशनच्या शिफारशींची अंमलबजावणी १९१५ च्या भारत सरकारच्या ठरावाद्वारे सर्वमान्य असल्याचे जाहीर केले व लोकांच्या राजकीय शिक्षणासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची गरज असून त्या संस्थावरील सर्व अनावश्यक निर्बंध दुर करण्याचा प्रयत्न भारत सरकाच्या १९१८ च्या ठरावाद्वारे संमत करुन स्थानिक स्वराज्य संस्थामधील निर्वाचित सभासदांमध्ये वाढ करण्यात यावी. ग्रामपंचायतीच्या विकासाला उत्तेजन देण्यात यावे. ग्रामपंचायतीचा अध्यक्ष निर्वाचित असावा. तो नियुक्त केलेला असू नये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरीता मतदानाचा अधिकार विस्तृत करण्यात यावा अशा शिफारशी मांडण्यात आल्या.

**मॉटचेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायदा - १९१९ :-**

हा कायदा भारतीय पंचायतीच्या घटनात्मक विकासातील महत्वाचा टप्पा आहे. या कायद्याची तुलना भारतीय जनतेला स्वातंत्र्याकडे जाण्याचा एक मार्गदर्शक म्हणून करण्यात आली. या कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारास नवीन पर्व निर्माण करण्यास चालना मिळाली. स्थानिक संस्थांना अधिकाधीक वित्तीय व कार्यकारी अधिकार बहाल केले. ह्या कायद्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय प्रांतीय प्रशासनातील सोपीव खाते म्हणून निर्माण करण्यात आला.

**भारत सरकारचा कायदा १९३५ :-**

भारत सरकार कायदा १९३५ नुसार प्रांतीय शासनाच्या कारभार भारतीय लोकांकडे सोपवण्यात आला आणि सन १९३७ या निवडणूकीनुसार प्रांतात भारतीय लोकांचे सरकार स्थापन झाले. १९३८ मध्ये संयुक्त स्थानिक सरकार आणि मुंबई सरकारची कार्यकक्षा ठरवून देण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली. या दोन वर्षाच्या काळात प्रांतिक सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात सुधारणा व्हावी या करीता अनेक महत्वपूर्ण कायदे पास केले. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा कारभार लोकनियुक्त प्रतिनिधीकडे सोपविण्यात यावा असा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. १९४२ मध्ये महात्मा गांधीने गोलमेज परिषदेत पंचायतराजच्या अप्रत्यक्ष निवडणूकीचा सल्ला दिला.

ब्रिटीश कालखंडात भारतातील पारंपारिक प्रशासन व्यवस्थेचा ऱ्हास होवून ब्रिटीशांनी अनुकूल अशा व्यवस्थेचा अंगीकार करण्यात आला. विशेषत: ब्रिटीशकालीन प्रयत्न हे प्रशासकीय सुविधेच्या दृष्टीकोनातून असले तर आधुनिक भारतीय प्रशासन मुर्हूतमेढ याच कालखंडात रोवली गेली हे देखील मान्य करावे लागते. ब्रिटीश काळात स्थानिक स्वशासनाच्या विकासात लॉर्ड मेयो व लॉर्ड रिपन यांनी महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे.

**स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्थानिक शासन :-**

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले भारतीय राज्यघटनेने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केला. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी सुरु झाली. आणि भारतीय जनता खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक झाली. भारतात लोकशाही विकेंद्रीकरणासाठी पंचायतराज व्यवस्था स्वीकारण्यात आली. निर्णय, स्वातंत्र्य, अधिकार आणि पुरेशी साधन सामुग्री दिल्यास पंचायतराज संस्था ग्रामीण भागात क्रांती घडवतील अशी कल्पना होती. भारतीय राज्यघटनेतील कलम ४० नुसार स्थानिक शासनासंबंधीची तरतूद करून गांधीजीची संकल्पना साकार केली. १९५७ मध्ये केंद्र सरकारने सामुदायिक विकास योजना व राष्ट्रीय विस्तार योजनांचा अभ्यास करण्यासाठी मेहता समितीची स्थापना केली. मेहता समितीने स्थानिक शासनासंबंधी अनेक तरतुदीचा समावेश करुन सत्ता विकेंद्रीकरण, ग्रामीण भागातील लोकांचा स्थानिक शासनात सहभाग, त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था, प्रत्यक्ष निवडणूक अशा महत्वपूर्ण शिफारशी सुचविण्यात आल्या. पंचायतराज व्यवस्था ही भारतीय लोकाशाहीचा आत्मा आहे. या व्यवस्थेला बळकटी प्राप्त करण्यासाठी केंद्र सरकारने १९६० नंतर अनेक समित्या नियुक्त केल्या यात राव समिती, ईश्वरन समिती, संथनाम समिती, मेहता समिती, सिंघवी समिती अशा अनेक समित्या गठीत करुन स्थानिक शासनाला बळकटी देण्याचे प्रयत्न झाले. परंतू सिंघवी समितीच्या अहवालानंतर पंचायत राज संस्थाना घटनात्मक दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू झाले या अनुषंगाने केंद्रसरकारने १९८९ मध्ये लोकसभेत ६४ वे घटनादुरुस्ती विधेयक मांडले परंतू राज्यसभेत हे विधेयक फेटाळले गेले.

**७३ वी घटनादुरुस्ती :-**

भारतासारख्या लोकशाही देशात एकूण लोकसंख्यापैकी निम्मी लोकसंख्या असणाऱ्या महिलांना स्वातंत्र्य, समता ,हक्क आणि सत्तेत सहभागी करुन घेण्याकडे अधिक तिव्रतेने १९७५ पासून भर देण्यात येऊ लागला. त्यानूसार १९७५ मध्ये भारतात कमिटी ऑन स्टेटस ऑफ प्लॅन फॉर वूमेन १९८८ चे कलम ११ नुसार महिलांच्या राजकारणातील गतिमानता वाढविण्यासाठी प्रयत्न झाले.

थोडक्यात आधुनिक काळात महिलांना पुरुषाबरोबर राजकीय क्षेत्रात जी संधी, अधिकारयुक्त स्थान मिळाले ते केवळ महिलांसाठी आरक्षित ठेवलेल्या ३३% महिलाची फलश्रुती आहे. या पार्श्वभूमीवर तात्कालीन प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी १५ मे १९८९ रोजी लोकसभेत मांडलेले पंचायतराज च्या संदर्भातील ६४ व्या घटनादुरुस्तीचे विधेयक १० ऑगस्ट रोजी लोकसभेत पारित झाले. परंतू राज्यसभेत नामंजूर झाल्यामुळे घटना दुरुस्ती होऊ शकली नाही. त्यानंतर १९९१ मध्ये पी.व्ही. नरसिंहराव सरकार सत्तेवर आल्यानंतर पंचायत संस्था बाबत नवीन घटना दुरुस्ती विधेयक संसदेत मांडायचे ठरले.७३ वी घटनादुरुस्तीच्या रुपाने हे विधेयक १६ सप्टेंबर १९९१ रोजी लोकसभेत सादर झाले नंतर डिसेंबर १९९१ मध्ये ते विचार विनीमयासाठी ३० सभासद असलेल्या संयुक्त संसदीय समितीकडे सोपविले गेले. संयुक्त संसदीय समितीने सविस्तर विचार विनिमयानंतर आपला अहवाल जुलै

१९९२ मध्ये संसदेत सादर केला. त्यानंतर २२ डिसेंबर १९९२ रोजी जवळ जवळ एक मताने ७३ व्या घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर झाले. राज्यसभेने २३ डिसेंबर १९९३ रोजी त्याला मंजूरी दिली. त्यानंतर १७ घटक राज्यातल्या विधीमंडळाची मान्यता मिळाल्या नंतर २० एप्रिल १९९३ रोजी विधेयकास राष्ट्रपतीची मान्यता मिळाली व २४ एप्रिल १९९३ पासून हा कायदा संपूर्ण भारतात अमलात आला.

७३ व्या घटनादुरुस्तीनुसार स्थानिक शासनात अमुलाग्र बदल झाले. घटनादुरुस्तीनुसार स्थानिक शासनास संवैधानिक दर्जा, ग्रामसत्ता, त्रिस्तरीय व्यवस्था, स्थानिक शासनाचा कार्यकाळ, वित्तीय तरतूद, राज्य वित्तआयोग व आरक्षणाची तरतूद करण्यात आली. ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार सामाजिक न्याय प्रस्तापित करण्याच्या उद्देशाने पंचायत राज संस्थामध्ये कलम २४३ (D) अन्वये तिन्ही स्तरावर आरक्षण धोरणाची तरतूद केली आहे. असे आरक्षण पदाधिकारी व सदस्य अशा दोन्ही पातळीवर अशा सर्वसाधारणपणे तीन प्रकारचे आरक्षण असेल.

१) अनुसूचित जाती व जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणास व त्यापैकी १/३ पेक्षा कमी नाही इतके प्रवर्गातील माहिलांसाठी आरक्षण असेल.
२) इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण घायवयाचे की नाही किती ? हे राज्याच्या इच्छेवर अवलंबून असेल मात्र त्यापैकी १/३ पेक्षा कमी नाही. इतके आरक्षण महिलांसाठी ठेवावे लागेल.
३) एकूण सदस्य व पदाधिकारी संख्येच्या कमीत कमी १/३ पेक्षा कमी नसेल इतके आरक्षण महिलांसाठी असेल.

७३ व्या संविधान दुरुस्तीमध्ये इतर मागासवर्गीयांना व स्त्रियांसाठी किती आरक्षण घावयाच्या संबंधी राज्यसरकारकडे सोपविण्यात आले. या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने विधानमंडळात विधीनीयम आणि स्थानिक शासनास महिलांना ५०% आरक्षणाची तरतूद २०११ मध्ये केली. याचा व ७३ वी संविधान दुरुस्तीचा परिणाम महिलांच्या सहभागाबाबत व महिला सक्षमीकरणासाठी उपयुक्त फायद्याचा ठरला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेतील गेल्या २५ वर्षातल्या आरक्षणाच्या अंमलबजावणीतून स्त्रियांच्या राजकारणातील सहभागाचा प्रवास संख्यात्मक, प्रतिकात्मतेकडून दृश्यात्मकतेकडून झाला आहे. स्त्रीयांचे स्थानिक शासनात निवडून येणे दखलपात्र झालेले आहे. आरक्षणातून सवर्ण महिला व मागासवर्गीय महिला पुढे येत असून त्यांच्यात सक्षमीकरणाची प्रक्रिया सुरु झाली आहे. याचा परिणाम व प्रभावाने संपूर्ण देशामध्ये नेतृत्व करण्यासाठी स्त्रिया पुढे आल्या आहेत. समाजातील दुर्लक्षीत घटक सत्तेत आला आहे. यामुळे गावाचे प्रश्न मांडण्यात महिलांना व्यासपीठ मिळाले. ७३ व्या संविधान दुरुस्तीने व २०११ च्या महिला विधेयकाने ग्रामपंचायतीचा एकूण उत्पन्नाचा ७०% रक्कम सबलीकरणावर खर्च व्हावी असा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. याचा परिणाम म्हणून महिला आपली स्थानिक शासनातील भुमिका सक्षमपणे सांभाळीत आहे.

महाराष्ट्र पंचायतराज व्यवस्थेमध्ये सध्या ९३००० पेक्षा अधिक महिला सदस्य उपेक्षीत व मागासलेल्या वर्गातून पुढे आलेल्या आहेत. महिलांचा प्रभावी सहभाग सामाजिक दृष्ट्या मैलाचा दगड ठरणारी बाब आहे. याचा परिणाम असा झाला की, विविध राजकीय पक्षांनी आपल्या पक्षात महिला अघाडीची स्थापना करून महिलांना जास्तीत जास्त प्रवेश दिला. ७३ व्या घटनादुरुस्तीने महत्वाचा फायदा झाला तो म्हणजे शासनातील तळागाळातून नवीन नेतृत्व उभे राहू शकले. लोकशाही विकसीत करण्यासाठी नेतृत्वाची गरज असते. व हे नेतृत्व आरक्षणाने

महिलामधून पुढे येत आहे. महत्वाच्या टप्प्यावर त्यांना मिळालेल्या संधीचा फायदा घेण्यासाठी त्या तयार आहेत. यातून त्यांच्यात आत्मविश्वास वाढत आहे. महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागामध्ये १९९३ मध्ये ग्रामपंचायतीच्या निवडणूका घेण्यात आल्या. विदर्भातील सालोद (अमरावती), एरनगाव (अमरावती), मेटीरवेडा (यवतमाळ), विटानेर (जळगाव) इत्यादी सर्व खेड्यातील ग्रामपंचायतीत स्त्रियांच्या पॅनलने विजय मिळविला आहे. सालोद येथे हिंदू सदस्यांचे प्रमाण जास्त असूनही एका मुस्लीम स्त्रीला सरपंच म्हणून निवडून दिले निवडून आलेल्या महिलांनी सर्व प्रथम कोणते काम केले असेल तर त्यांनी दारूची दुकाने बंद करण्यासाठी आंदोलन केली. ज्या दारूमुळे महिलांनी अनेक अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. त्या व्यसनावर आक्रमण केले व ही दुकाने बंद पाडली. तेंव्हा सत्ता म्हणजे खुर्ची हे समीकरण न मानणाऱ्या लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सत्तेतील अधिकार वापरणाऱ्या आपल्या हक्काविषयी जागरूक असणाऱ्या स्त्रिया जेंव्हा निवडून येतात तेंव्हा आरक्षणाला अर्थ प्राप्त होतो. ७३ वी घटनादुरुस्ती व महाराष्ट्र शासनाचे महिला धोरणामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय परिवर्तनास चालना मिळाली आहे. ग्रामीण भागात पुर्वी महिला सदस्य ग्रामसभेत जात नव्हत्या. आरक्षणामुळे ग्रामीण भागातील महिला सरपंच सभापती अध्यक्षपदाच्या खुर्चीवर विराजमान होत आहे. सरपंच घरात आणि त्यांचे यजमान कार्यालयात असे पूर्वीचे चित्र होते. आता ही परिस्थीती झपाट्याने बदलत असून महिला सभाग्रहात येऊन आपले प्रश्न मांडत आहे. हक्कासाठी झगडू लागल्या आहेत. ज्या स्थानिक शासनाचे बजेट व्यायामशाळा, मैदाने या सारख्या अझेंड्यावर प्राधान्याने खर्च होत असत त्या स्थानिक शासनाचे बजेट आता पाणी, रस्ते, शौचालये, आरोग्य यावर खर्च होत आहे. इतकेच नव्हे तर स्वतंत्र्याला साठ वर्षात पुरुषी सत्तेला जे जमले नाही. आशा अनेक सामाजिक उपक्रमात महिला सहभागी होत आहे. संत गाडगे बाबा स्वच्छ अभियान, निर्मल ग्रामयोजना, वृक्षारोपन, पाणलोट क्षेत्र विकास, हागणदारी मुक्त गाव योजना आशा अनेक समाज उपयुक्त कार्यात महिला सहभागी होऊन महिला सक्षमीकरणास बळ देत आहे. एकूणच ७३ वे संविधान व ५०% आरक्षणामुळे महिलांच्या विकासाला गती प्राप्त झाली असून त्यांच्यात पुढील प्रमाणे बदल घडून येत आहे.

१) आरक्षणामुळे महिलांच्या विकास प्रक्रियेतील सहभाग वाढला आहे.
२) शैक्षणिक क्षेत्रापुरती आवड मर्यादीत न राहता राजकारणातही वाढली आहे.
३) स्वत:चे निर्णय घेण्याचे सामर्थ्य स्त्रियांमध्ये आलेले आहे.
४) सामुहिक निर्णय घेताना दृढ निश्चय करून निर्णय घेण्याचे योग्यता महिलांमध्ये आली आहे.
५) परिवर्तन घडवून आणण्याची सकारात्मक विचारसरणी निर्माण झाली आहे.
६) लोकशाही पध्दतीने इतरांचे दृष्टिकोन बदलण्याची योग्यता तीने आत्मसात केली आहे.
७) स्वत:चे कार्य करण्यासाठी आत्मनिर्भरतेचा विकास झाला आहे.
८) पुरुषांसोबत कार्य करण्यासाठी जो संकोच होता, भीती होती ती कमी झाली आहे.
९) सत्तेचा वापर पुरुषापेक्षा अधिक चांगल्या पध्दतीने महिला करु शकतात, याची जाणीव पुरुषांना देखील झाली आहे.
१०) मागासलेल्या वर्गातील महिलांनाही राजकारणात पाऊल टाकण्याची संधी मिळाली आहे.

एकूणच ७३ वे विशोधन महिलांसाठी वरदान ठरले असून सामाजिक गुलामगिरीतून महिला बाहेर येत आहे, ही वस्तुस्थिती आहे परंतू महिलांच्या बाबतीत झालेला बदल हा सकारात्मक असला तर महिलांचे संपूर्णता सक्षमीकरण झाले असे म्हणता येणार नाही यात आणखी बदल करणे गरजेचे आहे. महिला या संख्यात्मक दृष्टीने पुरुषापेक्षा निम्म्या आहेत. आज जो काही महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे याचे श्रेय ७३ व्या संविधानाला

द्यावे लागेल परंतू आजही समाजात पुरुषी मानसीकता बदललेली दिसून येत नाही स्त्रियांना आजही भोग वस्तू म्हणूनच तिच्याकडे बघीतले जाते. राजकारणातही सरास महिलांचे शोषण होत आहे. स्त्री पदाधिकारी असेल तर तिच्या अधिकारावर पुरुष मंडळीच आक्रमण करुन पदाचा दुरुपयोग करीत आहे. या अनुषंगाने कडक कायद्यायची आवश्यकता आहे. ७३ व्या विशोधनाने व महाराष्ट्र सरकारने २०११ मध्ये महिलांना दिलेल्या ५०% आरक्षणाचा सवर्ण महिला बरोबर इतर मागासवर्गीय महिलांना आरक्षण प्राप्त झाले आहे हे खरे असले तरी इतर मागासवर्गीयात २४४७ जातीचा समावेश आहे यात महाराष्ट्रात धनगर, बंजारा, वंजारा, माळी या प्रमुख जाती आहेत. राजकारणात आरक्षणाचा फायदा याच जातीतल्या महिलांना झाला आहे. परंतू जो समाज आजही आधुनिक युगात राजकीय जागृत नाही. अशा गारुडी,बहुरुपी, कुभार, कैकाडी, बेलदार, लोहार, वडार, रामोसी, गोसावी, या महिलांचा समावेश नगण्य आहे मग अशा महिलांना ७३ व्या विशोधनाचा कितपत फायदा झाला याचा शोध घेणे गरजेचे आहे. वस्तुस्थिती तर अशी आहे की, या जमातीला स्थानिक शासनात सहभागाची संधीच प्राप्त होत नाही. या अनुषंगाने कायद्यामध्ये काळानुरुप बदल करुन अनुसूचित जाती जमाती व इतर मागास वर्गातील अतिपिछडीत जाती आहेत याचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी कायद्यात बदल करुन आरक्षणाची तरतूद करणे आवश्यक आहे.

**समारोप :-**

भारतातील स्थानिक शासनातील महिलांच्या सहभागाची उपयुक्तता प्रस्तुत लेखात महिलांचा प्राचीन कालखंडापासून ते स्वातंत्र्यानंतर महिलांच्या राजकीय सहभागात झालेला बदल या अनुषंगाने विवेचन करण्यात आलेले आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीचा परिणाम म्हणून महिलांत राजकीय क्षेत्रात क्रांतीकारक बदल झाले आहे परंतू यातही अति मागास जातींचा ज्या पध्दतीने सहभाग वाढविणे आवश्यक आहे त्या पध्दतीने सहभाग वाढलेला नाही. म्हणून आरक्षणाचा फेर विचार करणे गरजेचे आहे. ७३ व्या विशोधन करुन जसे स्थानिक शासनात महिलांना सहभागाची संधी उपलब्ध करुन दिली आहे त्याच प्रमाणे कायदेमंडळ, विधीमंडळ व स्थानिक शासनात जाती निहाय आरक्षणाची तरतूद करुन राजकीय सहभाग वाढविल्याशिवाय अतिपिछडीत जातींना न्याय मिळणार नाही. याची शासन स्थरावरुन गांर्भियाने दखल घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ :-**

१) कडू मोहिनी, भारतीय राजकारणातील स्त्रिया, विजय प्रकाशन, नागपूर, जुलै, २००८
२) द्विवेदी राकेश, महिला सशक्तीकरण चुनैतियाँ एवं रणनितीचा, पुर्वाश प्रकाशन, भोपाल, २००५
३) शिरसाठ श्याम, भारतीय स्थानिक स्वशासन, विद्या बुक्स् पब्लिशर्स, औरंगाबाद, जून - २०१०
४) सोलापूरे राजशेखर, महिला विकास प्रश्न पैलु, प्रयास, अरुणा प्रकाशन, लातूर, सप्टेंबर २०१२
५) सुराना राजकुमारी, भारत मे लोकतांत्रिक विकेंद्रीकरण और नव पंचायतराज राज, पब्लिकेशिंग, हाऊस, नागपूर, २००६
६) पोले कांतराव प्रल्हादराव, महाराष्ट्रातील पंचायत राज आणि महिला आरक्षण, अरुणा प्रकाश, लातूर, जानेवारी, २००९
७) Bind, Agrawal, १९८४, rural woman and the high yielding vanety rice technlogy in india in Economic and political wekly
८) आर.पी.सिंह, भारत मे स्थानिक स्वशासन, एटलांटिक पब्लिशर्स, दिल्ली, २००६